# पुण्यातली एक संध्याकाळ

संध्याकाळची वेळ होती. बाणेर रस्त्याच्या भरधाव आणि बेफाम रहदारीतून मी माझी गाडी कशीबशी आईबाबांच्या गल्लीत वळवली. खरे म्हणजे बाणेर रस्ता एकूण ४ लेन्सचा - २ जायला आणि २ यायला. पण गाड्या चालवणारे लोक रस्ता जणू १० लेन्सचा असल्याप्रमाणे चालवत होते. चेहऱ्यावर रूमाल गुंडाळून स्कूटर्स आणि मोटरसायकल्सवर ऐटीत आरूढ झालेले पुणेकर, देशी-विदेशी गाड्यांतून पुढे ड्रायव्हरला बसवून मागे पेपर वाचत बसलेले बिग बॉस, रिक्षा-मारूतीसारख्या छोट्या गाड्यात कोंबलेली माणसे, असे सगळे भरधाव त्या अविरत प्रवाहातून वाहात चालले होते. त्या भाऊगर्दीत भाजीपाल्याच्या हातगाड्या व एकदोन सायकलीही चिवटपणे मार्ग काढत होत्या. "थांबला तो संपला" हा सुविचार या सर्वांच्या जणू रक्तात भिनला होता. अंगात वारे शिरल्यासारखे सगळे सुसाट सुटले होते. रस्ता ओलांडू इच्छिणाऱ्या पादचाऱ्यांना चान्सच नव्हता - ते बिचारे पिसाळलेले कुत्रे मागे लागलेल्या कोंबड्यांप्रमाणे इतस्ततः धावत होते.

मी आधीच उद्‌विग्न मन:स्थितीत ऑफीसमधून बाहेर पडलो होतो. कस्टमरबरोबर झालेल्या कॉन्फरन्स कॉलमध्ये कस्टमरच्या मॅनेजरने आमच्या टीमची, आणि पर्यायाने माझी (मी प्रोजेक्ट मॅनेजर असल्याने) चांगलीच तासली होती. ’हे फीचर चालत नाही; हे करायला तुम्हाला कुणी सांगितले; टीमला एव्हढेही कसे माहित नाही’. एक ना दोन. कस्टमरने तब्बल २० तक्रारींची यादी वाचली होती. आणि त्या सर्व तक्रारी खऱ्याही होत्या. पण मी तरी काय करणार? एव्हरेस्ट चढायला निघालो होतो, आणि कंपनीने पर्वती चढायचाही अनुभव नसलेले गिर्यारोहक मला दिले होते! आणि हे माझे सहकारी एव्हढे मुजोर की कॉल चालू असताना मला मदत करायचे लांब राहिले, काही तर चक्क जांभया देत बसले होते!

कॉल संपल्यावर आमच्याच सेल्सच्या लोकांनी झापले ते परत वेगळेच. ‘हा कस्टमर टिकणे महत्त्वाचे आहे; तो आपला अन्नदाता आहे, नीट काम करा, नाही तर आपण सगळेच रस्त्यावर येऊ,’ वगैरे वगैरे.

सगळा दिवस कसा अंधाऱ्या बोगद्यात अडकल्यासारखा गेला.

कटकटी कधी एकट्या येत नाहीत. त्यांना सॉलिड टीममध्ये काम करायची आवड असते बहुतेक! या नियमाप्रमाणे अनेक नवीन उद्भवलेल्या समस्यांसंबंधी घरून दिवसभर फोन येत राहिले. प्लंबर आला नाही. शाळेतून वह्यांच्या आकारासंबंधी तक्रार आली आहे. गाडीचा इन्श्युरन्स संपला आहे.

मी प्रचंड वैतागलो होतो, भेलकांडलो होतो, कावून गेलो होतो. शेवटी ५ वाजता मी माझ्या आईवडिलांच्या घरी थोडा वेळ जायचा निर्णय घेतला. आईच्या हातचा आलं घातलेला चहा प्यावा म्हणजे तगमग थोडी कमी होईल असे वाटले.

आईबाबांचे घर एका चार मजली इमारतीत दुसऱ्या मजल्यावर होते. जिना चढू लागलो तसे संगीताचे स्वर कानावर पडू लागले. अरेच्या, बाबांची शिकवणी चालू होती बहुतेक. बाबांना संगीताचे व्यसनच होते.

टेल्कोमध्ये इंजिनियर, मॅनेजर असे करत त्यांनी आयुष्य काढले. पण त्यांचे मन त्यात नसायचे. मिळेल तो सगळा वेळ गाणे शिकणे, म्हणणे, आणि ऐकणे यात ते घालवत. पण बाबांची संगीताची आवड त्यांच्यापुरतीच मर्यादित राहिली होती. आई मुकाट्याने ऐकत असे, त्यांच्याबरोबर मैफीलींना जात असे, बाबांच्या कार्यक्रमात पहिल्या रांगेत बसून एकटक त्यांच्याकडे पाहात बसे. पण तिला संगीताची फार रुची होती असे कधी वाटले नाही. मी तर त्या सर्व प्रकाराला हिडीसफिडीसच केले. बाबांनी कितीवेळा मला बसवून शिकवायचा प्रयत्न केला. कितीवेळा मला मैफिलींना त्यांच्याबरोबर यायचा आग्रह केला. पण मी जाम दाद लागू दिली नाही.

गाण्याचा आवाज कानावर पडताच तसेच परत फिरावे असा विचार मनात चमकून गेला. पण परत फिरण्याइतकीही शक्ती माझ्यात उरली नव्हती. काय करावे हा विचार करतकरतच मी दाराशी जाऊन पोहोचलो. दार किलकिले उघडेच होते. मी कितीवेळा बजावले तरी आईबाबांना दार उघडे ठेवायची जाम हौस. "अरे, दार बंद ठेवून बसणे म्हणजे माणूसघाणेपणा", असे त्यांचे म्हणणे. आणि "उघडी दारे ठेवा आणि चोरांना आमंत्रण द्या" अशी माझी चिडचिड. दार ढकलून मी आत गेलो. मला पाहताच नेहमीप्रमाणे बाबांनी हसून स्वागत केले व आईला मी आल्याची वर्दी दिली. 'चहा मी पण घेईन बरं का' अशी त्यांनी पुस्ती जोडली.

खरे म्हणजे माझ्या आईवडिलांशी राहिलेल्या संबंधांत माझ्याकडून प्रेम, आपुलकी अशा भावनांचा आविष्कार होणे बंदच झाले होते. झालेच तर तुसडे उद्‌गार, सल्ल्यांचा भडिमार हे सर्व भरपूर होते. त्याला कारण इतर कुणीच नव्हते. माझी बायको अबोल होती पण माणूसघाणी नव्हती. तिने स्वत: कधीच आईबाबांविषयी माझ्याकडे तक्रार केली नव्हती किंवा त्यांच्याशी भांडण उकरून काढले नव्हते. मीच 'सून आणि सासू म्हणजे गॅस व लायटर' असे समीकरण माझ्या मनाशी ठरवून टाकले होते, व लग्नानंतर आईबाबांना आमच्यापासून दूर ढकलत राहिलो होतो. ते बिचारे मी म्हणेन ते ऐकत राहिले होते. बाबांना त्यांचे गाणे चालू असले की बाकी काहीही चालायचे. आणि आई मानी असल्यामुळे कधीच मला काही बोलत नसे. मग मेंढ्यांना हाकलणारे कुत्रे जसे शिरजोर होते, तसा मी झालो होतो. येता-जाता भुंकणे, टीका करणे, कटकट करणे असे माझे वागणे असे.

असे असूनही आईबाबांच्या वागण्यात अजिबात बदल नव्हता. मी अजूनही शालेय विद्यार्थी असल्याप्रमाणे ते माझी विचारपूस, चौकशी करत. मी व्यवस्थित खातो-पितो ना, वेळेवर झोपतो ना, अशी काळजी व्यक्त करत. अर्थात तेही मला चिडायला पुरे असे. 'मी आता काय कुकुलं बाळ आहे का?' अशी माझी चिडखोर प्रतिक्रिया असे. पण आपला हट्ट कधीही न सोडणाऱ्या विक्रम राजासारखे ते माझी काळजी घेत राहात; मला हे हवे का, ते हवे का, अशी विचारणा करीत राहात.

पण आज मी भांडण्याच्या किंवा काही टोमणे मारण्याच्या मन:स्थितीत नव्हतो. तेव्हढेही त्राण माझ्यात नव्हते. पायातले बूट घाईघाईत झटकून देत बाहेरच्या खोलीतल्या दाराजवळच्या खुर्चीत मी स्वत:ला झोकून दिले.

समोरच्या पलंगावर बाबा भिंतीला टेकून बसले होते. त्यांच्याजवळ तबला, तंबोरा आदी इलेक्ट्रॉनिक उपकरणे होती. त्यांच्यासमोर दोन मुलं बसली होती. एक बारा-तेरा वर्षांचा सडसडीत बांध्याचा मुलगा व एक आठ-नऊ वर्षांची चिमुरडी मुलगी. दोघे बहुधा भावंडे होती. मी डोळे मिटून पडून राहिलो. चहा आला की तो घेऊन इथून सटकायचे असे मी ठरवले.

बाबा त्या मुलांना म्हणाले, "हां, आता कुठला राग म्हणायचा?"

मुलांनी त्यांच्या वह्या चाळल्या. थोड्या वेळाने कल्याण म्हणायचे ठरले असे माझ्या कानावर आले. या सगळ्या शेकडो की हजारो रागांचा मला रागच होता. काहीतरी इकडचे सूर तिकडे केले की राग बदलला. म्हणे हा सकाळचा राग, आणि हा दुपारचा राग. वेळेचा आणि सुरांचा कसा काय संबंध हे लोक लावतात, मला समजत नव्हते. सगळे शास्त्रीय संगीत अवेळीच गायले जाते असे मला वाटे. काहीतरी वेळ घालवायचा उद्योग, दुसरे काय!

त्या मुलीने कल्याणचे आरोह आणि अवरोह म्हटले आणि मी थोडा चमकलो. तिच्या सुरेल आवाजात काहीतरी जादू होती. अवरोहात एक सूर थोडा कमी लागला, पण सुदैवाने बाबांनी तिला लगेच टोकले नाही. कारण तिच्या गाण्यात एक प्रवाह होता, जो त्या कमी लागलेल्या सुराला चुकून पाण्यात पडलेल्या डहाळीसारखा पटकन घेऊन गेला. तिच्यानंतर तिच्या भावाने कल्याणचे लक्षणगीत म्हटले. बाबांच्याकडून प्रत्यक्ष मी काहीच शिकलो नसलो तरी कानावर पडलेल्या बऱ्याच गोष्टी मला चांगल्या अवगत होत्या. फक्त मी कुणाला त्यांचा पत्ता लागणार नाही याची दक्षता घेत होतो! जसे आपण आपल्याला अवगत असलेल्या शिव्यांचे भांडार गुपित ठेवतो!

माझे डोळे मिटलेलेच होते. डोक्यात ऑफीसमधली, घरची, खऱ्या व काल्पनिक कटकटींची अशी विविध चित्रे भिंगरीसारखी गरागरा फिरत होती. कस्टमरचा रूक्ष आणि करडा आवाज त्याला पार्श्वसंगीत देत होता. पण मध्येच कल्याणचे सूर अधुनमधून डोकावत होते. मी कामाचे विचार झटकून देऊन गाण्यावर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला. त्या झिरपणाऱ्या सुरांत काहीतरी विशेष आहे हे मला जाणवू लागले होते.

थोड्या वेळाने दोघांनी गत म्हणण्यास सुरूवात केली होती. सुरावट नेहमीचीच होती, पण चीज वेगळी होती. मुलांनी आलाप घ्यायला सुरूवात केली. बाबांनी त्यांना सुचेल तसे उत्स्फूर्त आलाप म्हणायला शिकवले होते. त्यामुळे दोघेजण आता काहीतरी भयानक सूर लावणार असे मला वाटले. पण त्या मुलाने एक छान फिरणारी सुरावट गुंफून एक आलाप घेतला. "वा, छान!" बाबा उद्गारले. बाबांच्या शिकवण्याचे हे वैशिष्ट्य होते - ते नेहमी त्यांच्या विद्यार्थ्यांचे कौतुकच करत. पण हा आलाप ऐकल्यावर मीही चाट झालो. या मुलात क्रिएटिविटी होती नक्कीच. मग मुलीने आलाप घेतले. तिच्या वयाप्रमाणे ती थोडीशी बिचकूनच म्हणत होती. तिने सोपे आलाप म्हणणे पसंत केले. पण तिचा सुरेल, गोड आवाज ह्रदयाला भिडणारा होता. मी डोळे किलकिले करून तिच्याकडे पाहिले. ती अगदी तन्मय होऊन गात होती. एखाद्या तरबेज गायकाप्रमाणे आपला डावा हात हवेत हेलकावत होती. मी चकित झालो. कारण आजकालची मुले एकतर शास्त्रीय संगीत शिकतच नाहीत. शिकलीच तर एखाद्या स्पर्धेसाठी किंवा आईवडलांच्या आग्रहाखातर शिकतात. आणि मग त्यांच्या बोअर झालेल्या गाण्यातून ते लगेच जाणवते. पण ही मुलगी एकटक आजोबांकडे (सर्व

मुले माझ्या बाबांना आजोबा म्हणत, आणि बाबाही आजोबांसारखे प्रेमाने शिकवत) बघत सूर आळवत होती. मी पुन्हा डोळे मिटले.

आईने बहुतेक मी आल्याचे ऐकलेच नव्हते. कारण अजून चहाचा पत्ता नव्हता. पण आता मी देखील घाईत नव्हतो. उठून आत जाऊन तिला सांगायची तसदी घ्यायची मला इच्छा झाली नाही. तसाच मी निवांत पडून राहिलो. डोक्यात घोंघावणारा कस्टमरचा आवाज आता क्षीण झाला होता. गरगर फिरणारी चित्रेदेखील दमल्यासारखी मंदावली होती, धापा टाकत होती. कल्याण राग आता संपला होता व आसावरी सुरू झाला होता. माझे बाबा नेहमी म्हणत की आसावरी, भैरव, व जौनपुरी असले तीनचार राग शिकवले की बाकी सर्व राग तुम्ही आपले आपण शिकू शकता.

मी आता त्या मुलांच्या संगीतात नकळत अडकू लागलो होतो. पुढे काय येणार आहे याचा अंदाज करू लागलो होतो. आसावरी राग मुळातच काळजाला हात घालणारा. त्यात त्या मुलीची मधुर सुरावट ऐकून मी मंत्रमुग्ध झालो. तिच्या आलापांबरोबर हेलकावे खाऊ लागलो. त्या मुलाच्या सुपीक डोक्यातून येणाऱ्या अनपेक्षित सुरांचा मागोवा घ्यायचा प्रयत्न करू लागलो. अधेमधे येणारे बाबांचे गद्य उद्गार त्या सुरांच्या नदीत सामावून जात होते - प्रवाहात मध्येच येणाऱ्या पण प्रवाहात अडथळा न आणणाऱ्या दगडधोंड्यांसारखे. आसावरी राग बहुधा ही मुले बरेच दिवस शिकत असावीत. कारण ती दोघे आलापानंतर गत व नंतर ताना पण घेऊ लागली. ताना त्यांना त्यांच्या गुरूजींनी लिहून दिल्या होत्या. त्यामुळे ते त्या एकापाठोपाठ सफाईने म्हणत होती.

माझ्या डोक्यातले वादळ आता बरेचसे शमले होते. शांत होऊन मी संगीताचा आस्वाद घेत होतो. वेळेचे भान विसरलो होतो. संगीताचा मला तिटकारा आहे हे विसरलो होतो. आईबाबांकडे मी पाच-दहा मिनटाहून जास्त वेळ थांबत नाही हा शिरस्ता विसरलो होतो. आसावरीनंतर भैरव व शेवटी यमन गाऊन मुले थांबली. एव्हाना माझ्या डोळ्यात अश्रू गोळा झाले होते. पण मी त्यांना अटकाव न घालता तसाच पडून राहिलो.

बाबा म्हणाले, "अरे, याला झोप लागली वाटतं. अगं, चहाचे काय झाले?"

मी डोळे उघडले. मुले माझ्याकडे पाहून स्मित करीत होती. त्यांना मी परिचित होतो, कारण माझे येणे जाणे त्यांनी पूर्वी पाहिले असणार. पण मी त्यांना प्रथमच नीट पाहात होतो. त्यांनाच काय, माझ्या वडलांनादेखील प्रथमच भेटल्यासारखे मला वाटत होते. "फारच छान!" मी उद्गारलो.

बाबा बहुतेक चकित झाले असणार. पण आपल्या मुलाला शास्त्रीय संगीत आवडत असणारच अशा त्यांच्या नेहमीच्या प्रेमळ समजुतीप्रमाणे ते म्हणाले, "हो! ही मुले छान गातात. सूरज्ञान छान आहे दोघांनाही."

"सूर तर छान आहेतच. पण रागांचे understanding ही किती सुरेख आहे!" मी माझा नेहमीचा आढ्यतेखोरपणा सोडून मोकळेपणे बोलू लागलो. "वा, खूप मजा आली. काय रे तुमची नावे?"

त्यांनी बहुधा पूर्वी मला बऱ्याचदा सांगितली असली तरी पुन्हा सांगितली, "केदार आणि श्रुती".

"वा, संगीतातलीच नावे आहेत तुमची," मी उद्गारलो.

"हो. हिचे सूरदेखील कधी कधी श्रुती म्हटल्यासारखेच लागतात," केदार मिश्किलपणे म्हणाला.

बाबांना नमस्कार करून ती मुले निघून गेली. मी मात्र तिथेच खिळून राहिलो. किती भाग्यवान आहेत ही मुले. बाबांसारखा ज्ञानी आणि प्रेमळ गुरू त्यांना मिळाला होता, आणि त्याचा पुरेपूर फायदा ते नक्कीच करून घेत होते. आणि मी? गेली तीस-चाळीस वर्षे ही गंगा माझ्या डोक्यावरून वाहात होती, आणि मी मात्र उंटासारखा वाळवंटातून रखडत होतो. संगीताची ही अद्भुत शक्ती मला माहितीच नव्हती. आजच्या एका दिवसाचाच काय, कित्येक महिन्यांचा शीण निघून गेल्यासारखा मी सजीव, सचेतन झालो होतो. मनात एक नवीन उभारी आली होती.

"अरे, तुला काय बरे नाही की काय?" आई आता बाहेर आली होती.

मी तिच्याकडे पाहून एक मधुर हास्य केले. अर्थात ती चकित झाली असणार, कारण यापूर्वी मी आईकडे पाहून कधी स्मित केले होते हे आता मलादेखील आठवत नाही.

"आई, एक मस्त चहा कर बघू. आलं वगैरे सगळं टाकून. साखर विसरू नकोस. बाबांना पण."

"अरे, मला कशाला साखर?" बाबा म्हणाले.

"ते काही नाही. एव्हढ्या साखरेने काही तुमचा आवाज कडू होणार नाही."

"बरं बरं," बाबांनी हसत विरोध सोडून दिला.

मी म्हणेन ते आई-बाबा नेहमीच ऐकत व करत. पण त्यांचा केवळ गैरफायदाच मी इतके दिवस घेत आलो होतो. आज पहिल्यांदा मी त्यांच्याकडे डोळे भरून नीट पाहिले. दोघेही सत्तरीच्या पुढे गेले होते. आता किती वर्षे उरली होती देव जाणे. किती प्रदीर्घ काळ मी त्यांच्याविषयीच्या बेपर्वाईत घालवला होता! त्यांच्यासाठी मी केव्हढे काही करू शकलो असतो! पण तो विचार मी मनातून झटकून टाकला. आता भूतकाळ संपला. Tomorrow is a new day. उद्यापासून सर्व चित्र वेगळे असणार आहे.

दहा मिनटांसाठी गेलेला मी तब्बल दोन तास थांबलो. आईबाबांची विचारपूस केली. त्यांच्या औषधपाण्याची चौकशी केली. बाबांना एक अहिरभैरवमधली धून म्हणण्याचा आग्रह केला. आणि भरलेल्या पण तृप्त अंतःकरणाने बाहेर पडलो.

---oooo(((())))oooo---

शब्दांकनः अभय बिंदुमाधव जोशी (abjoshi@yahoo.com), *Last updated: 18 May 2014*